राष्ट्रोध्दाराय तंत्र शिक्षणम्

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४
Email ID: ropune@dtemaharashtra.gov.in
Web: www.ropune.org.in

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
**४१२, ई, शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६.**

जा.क्र.तंशिविकापु/आस्था-१/२०२२/ ३५३४  दिनांक : 26 JUL 2022.

प्रति,

प्राचार्य,

शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,कराड (पदवी व पदविका)

भारती विद्यापीठ इन्स्टिटयुट ऑफ फार्मसी,पुणे

पुना कॉलेज ऑफ फार्मसी,पुणे

कॉलेज ऑफ फार्मसी,सोलापूर

कॉलेज ऑफ फार्मसी,मिरज

इन्स्टिटयुट ऑफ फार्मसी,उजळाईवाडी

विषय – रिट याचिका क्र.८४८६/२०२१ सलमा शेख व इतर विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर

संदर्भ - १.मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र.५/तंशिसं/न्यायाप्र/सलमाशेख/८४८६/२०२२/२९९ दिनांक २९/०६/२०२२

२.संचालनालयाचे पत्र क्र.५(३)/वेनि/M.Pharm/वेतनवाढ/२०१६/५५ दिनांक ०३/०२/२०१६

उपरोक्त संदर्भ क्र.१ च्या पत्राचे अवलोकन करावे. सदर पत्रातील सुचनेनुसार आपल्या संस्थेतील एम.फार्म प्राप्त अध्यापकांची वेतनवाढीबाबतची तसेच अतिप्रदानाची वसूली करण्यात आलेली आहे किंवा कसे याबाबतचीही माहिती मागविण्यात आलेली होती.

सदर माहितीचे अनुषंगाने आपणांस कळविणेत येते की, आपल्या संस्थेतील ज्या अध्यापकांनी दिनांक ०१/०१/२००६ पुर्वी एम.फार्म ही शैक्षणिक अर्हता धारण केल्यामुळे वेतनवाढीचा लाभ घेतलेला आहे त्यांची संदर्भ क्र.२ अन्वये वसुली करणे अनिवार्य आहे. सबब सदर वसुलीचे आदेश संस्थास्तरावर तात्काळ निर्गमित करावेत, वसुलीची रक्कम शासनांस जमा करावी . सदर माहिती संदर्भ क्र.१ मधील विवरणपत्र १ मध्ये तयार करुन ती या कार्यालयांस est.ropune@gmail.com वर आजच मेलव्दारे पाठवावी. सदर माहिती न्यायालयांस सादर करावयाची असल्यामुळे प्रथम प्राधान्याने कार्यवाही करावी.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- संगणक विभाग यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

Endorsement

महाराष्ट्र शासन
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४०५/२५/७२ ई-मेल-desk5@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: ttp://www.dtemaharashtra.gov.in

जा. क्रमांक- ५/तंशिसं/न्यायाप्र/सलमाशेख/८४८६/२०२२/2 9 9 दिनांक - 2 9 JUN 2022

न्यायालयीन प्रकरण/तात्काळ

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई /पुणे /नाशिक /औरंगाबाद /अमरावती /नागपूर

विषय: W.P. 8486/2021
सलमा शेख व इतर विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर

संदर्भ : १) मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथील दि. २१.०६.२०२२ रोजीची सुनावणी.
२) संचालनालयाचे पत्र क्र. ५/तंशिसं/न्यायालयीन प्रकरण माहिती/२०२२/१९४ दि.२२/०४/२०२२
३) संचालनालयाचे पत्र क्र. ५(३)/वेनि/M.Pharm/वेतनवाढ/२०१६/५५ दि.०३/०२/२०१६

उपरोक्त विषयास अनुसरुन, तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद अंतर्गत कमला नेहरु तंत्रनिकेतन (फार्मसी), औरंगाबाद या अनुदानित पदविका संस्थेतून अधिव्याख्याता या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या श्रीमती सलमा शेख व श्री विजय आर. कटारीया यांनी एम. फार्मसी पदवी धारण केल्याने त्यांना एक आगाऊ वेतनवाढ अनुज्ञेय करणेबाबत मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्र. 8486/2021 दाखल केलेली आहे.

सदरील न्यायालयीन प्रकरणी श्रीमती सलमा शेख व इतर यांनी दि. १४.०३.२०२२ रोजी मा. उच्च न्यायालयात Rejoinder दाखल केलेले आहे. सदर Rejoinder सोबत Exhibit P-७ (Page no. ३७६ to ३८४) अधिव्याख्यात्यांची यादी जोडली आहे. संचालनालयाच्या संदर्भीय पत्र दि. २२.०४.२०२२ अन्वये विहित प्रपत्रात सदरील यादीतील अधिव्याख्यात्यांची माहिती मागविण्यात आलेली होती. उपरोक्त माहिती संचालनालयास प्राप्त झालेली आहे.

संचालनालयाच्या संदर्भीय ३ च्या पत्रास अनुसरुन Exhibit P-७ (Page no. ३७६ to ३८४) यादीत नमूद व तत्सम इतर अधिव्याख्याता ज्यांना एम. फार्म. अभ्यासक्रमाच्या वेतनवाढी अनुज्ञेय केलेल्या आहेत असे आपल्या विभागांतर्गत असलेल्या अधिव्याख्यात्याकडून अतिप्रदानाची वसूली करण्यात आलेली आहे किंवा कसे? वसूली केलेली असल्यास त्याबाबतचा तपशील सोबतच्या विवरणपत्र १ मध्ये संचालनालयास सादर करावा. तसेच वसूली करण्याबाबतचे आदेशाची प्रत व अतिप्रदान वसुल केलेली रक्कम शासनास भरल्याच्या चलनाची प्रत सोबत जोडण्यात यावी तसेच ज्या अधिव्याख्यात्यांना एम.फार्म या उच्च शैक्षणिक अर्हता धारण केल्याच्या अनुषंगाने वेतनवाढीचा लाभ अनुज्ञेय नसतांना दिलेला असल्यास त्यांची संचालनालयाचे पत्र संदर्भीय ३ अन्वये वसूली बाबतची पडताळणी करुन वसुली न केल्याची / प्रलंबित असल्याबाबतची कारणे नमूद करुन त्यांचीही माहिती सोबतच्या विवरणपत्र २ मध्ये संचालनालयास सादर करावी.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
3 0 JUN 2022
६९०८

विवरणपत्र- १

विभागीय कार्यालयाचे नांव-

| अ. क्र. | अधिव्याख्यात्याचे नांव व संस्थेचे नांव | सेवेतील रुजु दिनांक | एम.फार्म. अभ्यासक्रम उत्तीर्ण केल्याचा दिनांक व श्रेणी | एम. फार्म. अभ्यासक्रगाच्या प्रत्यक्षात वेतनवाढी मिळाल्याचा दिनांक | एम. फार्म. वेतनवाढीचा आदेश क. व मान्यतेचे पत्र क्र. | अतिप्रदानाची वसूली करण्यात आली आहे का? | वसुली केलेली असल्यास वसुलीचा आदेश क्र. | चलन क्र, रक्कम व दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

विवरणपत्र- २

| अ. क्र. | अधिव्याख्यात्याचे नांव व संस्थेचे नांव | सेवेतील रुजु दिनांक | एम.फार्म. अभ्यासक्रम उत्तीर्ण केल्याचा दिनांक व श्रेणी | एम. फार्म. अभ्यासक्रमाच्या प्रत्यक्षात वेतनवाढी मिळाल्याचा दिनांक | एम. फार्म. वेतनवाढीचा आदेश क. व मान्यतेचे पत्र क्र. | अतिप्रदानाची वसूली करण्यात आली आहे का? | वसुली केलेली नसल्यास / प्रलंबित असल्यास त्याची कारणे व आदेश क्र. | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

सदरहू माहिती दि. ३० जून २०२२ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत ईमेल द्वारे पाठविण्यात यावी.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

Exhibit - R-1 Copy

72

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१
E-mail :- desk5@dte.org.in Web :- http://www.dte.org.in

क्र.५(३)/वेनि/M.Pharm/वेतनवाढ/२०१६/५५
दिनांक : 03/02/2016

प्रति,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद /अमरावती / नागपूर.

*विषय : शासकीय/अशासकीय अनुदानित पदवी/पदविका संस्थेतील शिक्षकांनी M.Pharm. ही उच्च शैक्षणिक अर्हता धारण केल्यामुळे मिळणाऱ्या अतिरिक्त वेतनवाढीबाबत....*

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यांत येते की, राज्यातील शासकीय / अशासकीय अनुदानित पदवी / पदविका संस्थेतील शिक्षकांच्या वेतननिश्चितीचे काम या संचालनालयाकडून करण्यांत येते. सदर शिक्षकांची सहाव्या वेतन आयोगानुसार वेतननिश्चिती, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र. एसपीसी-२०१०/(३४/१०)/टिई-२, दि.२०/८/२०१० च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करण्यांत येतात.

ज्या शिक्षकांनी M.Pharm ही उच्च शैक्षणिक अर्हता धारण केली आहे त्यांना या संचालनालयाचे पत्र क्र.५(३)/व.श्रे.नि.श्रे./वेपप/२००७/३२७६५, दि.९/३/२००७ मधील मुद्दा क्र.५ अन्वये ५व्या वेतन आयोगा (शासन निर्णय दि.१८/१२/९९ व दि.२७/२/२००३) मध्ये M.Pharm ह्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी आगाऊ वेतनवाढी देण्याची तरतुद नसल्यामुळे M.Pharm या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी आगाऊ वेतनवाढी देण्यांत येऊ नयेत. अशा प्रकारच्या वेतनवाढी दिल्या असल्यास संबंधितांची पुन्हा नव्याने वेतननिश्चिती करण्यांत यावी व सदरच्या वेतननिश्चितीनुसार अतिप्रदान झाले असल्यास ते संबंधितांकडून वसूल करण्यांत यावे अशा सुचना दिल्या होत्या. त्याच प्रमाणे ६ व्या वेतन आयोगाच्या दि.२०/८/२०१० च्या शासन निर्णयामध्ये सुध्दा M.Pharm ह्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी आगाऊ वेतनवाढी देण्याची तरतुद नसल्यामुळे त्यांना सदर वेतन वाढी देऊ नयेत. तरी सुध्दा या संचालनालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही संस्थांमध्ये M.Pharm बाबतच्या आगाऊ वेतनवाढी संस्थास्तरावर देण्यांत आल्या आहेत. तरी याबाबत आपणांस असे कळविण्यांत येते की, आपल्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित संस्थामधील ज्या अध्यापकांना M.Pharm ही उच्च शैक्षणिक अर्हता धारण केल्याबद्दल अतिरिक्त वेतनवाढी देण्यांत आल्या आहेत त्यांच्या त्या वेतनवाढी काढून घेऊन त्यांची पुनः वेतननिश्चिती करण्यांत यावी व झालेल्या अतिप्रदानाची वसुली सबंधितांकडून करण्यांत यावी. तसेच आपणांस असेहीं कळविण्यांत येते की, ज्या अध्यापकांना M.Pharm झाल्याबाबत वेतनवाढी देण्यांत आल्या आहेत त्यांची एकत्रित माहिती या संचालनालयास सादर करण्यांत यावी.

तसेच पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांमध्ये ५ व्या वेतन आयोगामधील सहाय्यक प्राध्यापक हे सहाव्या वेतन आयोगामध्ये सहयोगी प्राध्यापक आहेत व सहाव्या वेतन आयोगानुसार सहयोगी प्राध्यापकासाठी Ph.D.ही शैक्षणित अर्हता आवश्यक आहे. त्यामुळे दिनांक १/१/२००६ नंतर ज्या सहयोगी प्राध्यापकांनी Ph.D.ही शैक्षणित अर्हता धारण केली असेल त्यांना ३ अतिरिक्त वेतनवाढी देण्यात येऊ नयेत. अशा प्रकारच्या वेतनवाढी आपल्या स्तरावर दिल्या गेल्या असतील तर त्यांच्या त्या वेतनवाढी काढून घेऊन त्यांची पुनः वेतननिश्चिती करण्यांत यावी व झालेल्या अतिप्रदानाची वसुली संबंधितांकडून करण्यांत यावी. व त्याबाबतचा अहवाल एकत्रित करुन या संचालनालयास पाठविण्यांत यावा.

आवक क्र. 1296
दिनांक - 9 FEB 2016

8/2/16

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक
तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई-१

प्रत : कार्यासन क्रमांक ७, ८ व १५, तंत्रशिक्षण, मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीकरीता.

Attested